चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
२७ जुलै, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7447744100 (PRO)

# जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस २४ तासात अटक
# रामनगर पोलीसांची कार्यवाही

दिनांक २४/०७/२०१९ रोजी फिर्यादी श्रीमती भालेकर, रा. छत्रपती नगर चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन रामनगर येथे तक्रार दिली की, कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे गळयातील १७ ग्रॅमचे सोन्याचे कंठीमाळ जबरीने चोरून नेले. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र ९५६/२०१९ कलम ३९२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेण्यात आला.

गुन्हा नोंद होताच गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी घटनास्थळ गाठुन तपासास सुरूवात केली. गुन्हा लवकरात लवकर उघडकीस यावा या दृष्टीने वेगवेगळया पदध्तीने तपास चक्रे फिरवुन व गोपनीय सुत्राद्वारे माहिती गोळा करून एका संशयीत इसमास ताब्यात घेण्यात आले. सदर इसमाची गुन्हयाच्या अनुषंघाने कसुन चौकशी केली असता, सदर संशयीत इसम आरोपी नामे गणेश सुरेश फाले वय ३२ वर्ष रा. बियाणी नगर तुकुम चंद्रपुर याने फिर्यादी महिलेच्या गळयातील सोन्याची कंठीमाळ चोरी केल्याची कबुंली दिल्याने त्यास अटक करण्यात आली. सदरचा गुन्हा अवघ्या काही तासातच उघडकीस आला असुन आरोपीकडुन १७ ग्रॅम सोन्याची कंठीमाळ किं. ५७,०००/—रू व त्याने गुन्हयात वापरलेली एक हिरो होंडा स्प्लेंडर क्र. एमएच ३४ एडी ५२७२ किं. २०,००० असा एकुण ७७,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन रामनगर प्रभारी पोनि. श्री. हाके, यांचे नेतृत्वात सपोनि. श्री. संतोष दरेकर, सफौ. प्रभुदास माहुलीकर, पोहवा. आनंद परचाके, रजनीकांत पुठ्ठावार, पोना. शंकर येरमे, सुधीर पाटील, पोशि. निलेश मुंडे, माजीद पठाण यांनी केला.

————————————————————————————————